# नागपूर सुधार प्रन्यास
## मेट्रो विभाग

नागपूर सुधार प्रन्यास सांस्कृतिक संकुल, तिसरा माळा, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर-४४० ०१०

क्रमांक : का.अभि.(मेट्रो)/ ६२० नागपूर, दिनांक :२९/११/२०१३.

प्रति,
मा. जिल्हाधिकारी
नागपूर.

विषय :— मौजा सुकळी (बेलदार), खसरा कमांक ४/१, तह. हिंगणा, क्षेत्र ७.९४ हेक्टर आर. जागा निवासी प्रयोजनार्थ अकृषक परवानगीबाबत.

संदर्भ :— अर्जदाराचा दिनांक ३०.०९.२०११ चा अर्ज.

महोदय,

विषयांकित प्रकरणातील जागा 'निवासी' वापरार्थ अकृषी करणे प्रकरणी अभिन्यास मंजूरीचे प्रकरण संदर्भांकित अर्जान्वये प्राप्त झाले आहे.

अंतिम प्रादेशिक योजना—नागपूर प्रदेश नूसार उक्त जागा बुटीबोरी ग्रोथ सेंटर अंतर्गत समाविष्ट असून कृषी या क्षेत्रात अंतर्भूत आहे. योजनेतील तरतुदीनुसार या जागेत प्रस्तावित वापर अनुज्ञेय आहे.

संदर्भाधिन पत्रासोबत या कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रकरणातील अभिन्यासाची तांत्रिक छाननी करून, मा. सभापती नागपूर सुधार प्रन्यास यांनी दिनांक २५/११/२०१३ रोजी सदर अभिन्यासाला अंतिम मंजूरी प्रदान केलेली आहे. उक्त जागेला निवासी प्रयोजनार्थ अकृषक करण्याकरीता खालील अटी शर्तीवर शिफारस करण्यात येत आहे.

१. अभिन्यासातील भूखंडकाचा उपयोग फक्त निवासी वापराकरीता करण्यात यावा
२. सभोवतालचे मंजूर अभिन्यासातील रस्त्यांशी योग्यरितीने समन्वय साधणे आवश्यक आहे.
३. अभिन्यासाची जागेवरील प्रत्यक्ष आखणी केल्यानंतर अभिन्यासातील राखून ठेवलेल्या खुल्या जागेचे क्षेत्रफळ अभिन्यासातील जागेच्या एकूण क्षेत्रफळाच्या १०% पेक्षा कमी असु नये.
४. "सार्वजनिक सोयी व सुविधा" करिता प्रस्तावित केलेल्या भुखंडाचे क्षेत्रफळ एकुण क्षेत्रफळाच्या १५% पेक्षा कमी असु नये.
५. अभिन्यासातील जागेत काही वृक्ष असल्यास, भूखंड आखतांना ते नष्ट न करता विद्यमान स्थितीत कायम ठेवावीत.
६. विषयांकित जमिनीतन विद्युत वाहिनी/दूरध्वनी वाहिनी जात असल्यास उक्त वाहिनी

उपविधी व विकास नियंत्रण नियमावली लागू आहे.

८. विषयांकित जागेलगत/जागेतून पाण्याचे स्त्रोत जात असल्यास संबंधित पाटबंधारे/जलसिंचन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल.

९. पावसाच्या पाण्याचे जलसंवर्धन (Rain Water Harvesting) ची व्यवस्था अभिन्यासात करावी लागेल.

१०. अभिन्यासातील रस्ते व खुली जागा योग्य प्रकारे विकसीत करून ती विशेष नियोजन प्राधिकरणास विनामुल्य हस्तांतरीत करावे लागतील.

११. जमीनीचे मालकी हक्काबाबत महसूल विभागाचे स्तरावर खात्री करून घेणे आवश्यक राहील.

१२. अभिन्यासात सार्वजनिक पाणी पुरवठयाची व सांडपाण्याची प्रक्रीया करून विल्हेवाट करण्याची व्यवस्था जमिन मालक/विकासक यांनी स्वतःचे खर्चाने करणे आवश्यक राहील.

१३. अभिन्यासात निर्माण होणाऱ्या सांडपाण्याचा (Black & Grey Water) पुनर्वापर करण्यासाठी (बगीचा, लॅन्ड स्केपिंग, फिशींग, फिश पॉड, रस्ते सफाई, संडास व मुतारीत उपयोगासाठी व धुण्यासाठी) नासुप्रच्या विश्वस्त मंडळाच्या ठराव क्र. २७/१०९२/०७.०१.२०११ च्या प्रावधानांनूसार सांडपाणी (Black & Grey Water) प्रकिया केंद्र उभारणे आवश्यक राहील.

१४. विषयांकित जागेवर बांधकाम सुरू करण्यापूर्वी बांधकाम नकाशे विशेष नियोजन प्राधिकरण कडून मंजूर करून घ्यावे.

१५. अर्जदारास नागपूर सुधार प्रन्यास सोबत विकास करारनामा करावा लागेल.

अभिन्यासाच्या दोन प्रती यासह या कार्यालयामार्फत पाठविण्यात येत आहेत. कृपया उक्त जागेला अकृषक परवानगी प्राप्त झाल्यानंतर अकृषक आदेशाची प्रत या कार्यालयास पाठविण्यांत यावी, ही विनंती.

सहपत्र : अभिन्यास नकाशाच्या २ प्रती.
[ख.क्र. ४/१, मौजा सुकळी (बेलदार), ता.हिंगणा]

कार्यकारी अभियंता (मेट्रो)
नागपूर सुधार प्रन्यास

प्रतिलीपी :—

श्री कमलकिशोर गुरूप्रसाद जयस्वाल
कॅनल रोड, रामदासपेठ,
नागपूर.